सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानपरिषद
# नियम समितीचा दुसरा अहवाल
# २०१६

(दिनांक डिसेंबर, २०१६ रोजी विधानपरिषदेस सादर केला)

15 DEC 2016

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, नागपूर
डिसेंबर, २०१६

महाराष्ट्र विधानपरिषद नियम समितीचा
दुसरा अहवाल २०१६

# विधानपरिषद नियम समिति
## (२०१५-१६)

**समिति प्रमुख**

(१) श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

**सदस्य**

(२) श्री. धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद (दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त)

(३) श्री. रामनाथ मोते, वि.प.स. (दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त)

(४) श्री. नागो गाणार, वि.प.स. (दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त)

(५) ॲड. अनिल परब, वि.प.स.

(६) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(७) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(८) श्री. मुझफ्फर हुसेन, वि.प.स. (दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त)

(९) श्री. दिलीपराव देशमुख, वि.प.स

**विशेष निमंत्रित**

(१०) श्री. माणिकराव ठाकरे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

(११) श्री. शिवाजीराव देशमुख, वि.प.स.

(१२) श्री. प्रकाश बिनसाळे, वि.प.स. (दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव

(३) श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी

(४) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव

(५) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव

(६) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

## अहवाल

मी, विधानपरिषद नियम समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अहवाल सादर करण्यास मला प्राधिकृत केल्यावरून विधानपरिषदेला हा अहवाल सादर करीत आहे.

२. **"अनुसूची-एक"** मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे, महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी सभागृहाच्या कामकाजाच्या वेळेमध्ये बदल करण्याबाबत चर्चा होवून घेण्यात आलेला निर्णय, त्याचप्रमाणे, अतारांकित प्रश्नांची उत्तरे प्रसिध्द करण्याबाबत सभागृहात दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी करण्यात आलेली घोषणा या अनुषंगाने महाराष्ट्र विधानपरिषद नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी दोन सूचना/सुधारणा समितीपुढे विचारार्थ होत्या. समितीकडे प्राप्त झालेल्या सदर सूचना/सुधारणा **" अनुसूची-दोन"** मध्ये देण्यात आल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने व्यापक विचारविनिमय होण्याच्या दृष्टीने समितीची दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी बैठक झाली. समितीने मान्य केलेल्या सूचना/सुधारणा **"अनुसूची- तीन"** मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

३. समितीने **दिनांक १४ डिसेंबर, २०१६** रोजी संमत आणि स्वीकृत केलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (१) :नियम ४ च्या पोटनियम (२) मधील (अ),(ब) व (क) वगळून त्याऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-**

"सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, सभागृहाच्या बैठकी, सामान्यपणे, सोमवार ते शुक्रवार या दिवशी दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन १४.३० ते १५.०० वाजेपर्यंतच्या अर्ध्या तासाच्या विश्रांती कालानंतर १९.०० वाजता समाप्त होतील".

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (२) : नियम ७० च्या पोटनियम (२) नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :-**

"परंतु आणखी असे की, मा. सभापतींना सभागृहाचे अधिवेशन सुरु नसेल तेव्हा अतारांकित प्रश्नांची उत्तरे विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आली नसली तरी, ती छापण्याचा, प्रसिध्द करण्याचा, प्रसृत करण्याचा तसेच, सदस्यांना वितरीत करण्याचा आदेश देता येईल. त्याबाबतीत सभागृहाच्या पुढील अधिवेशनात पहिल्या सोयीस्कर वेळी अशी अतारांकित प्रश्नांची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील".

**हा अहवाल व त्याव्दारे महाराष्ट्र विधानपरिषद नियमांत सुचविण्यात आलेल्या सुधारणा सभागृहाने स्विकाराव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

**विधान भवन :**
नागपूर
दिनांक : १४ डिसेंबर, २०१६

**रामराजे नाईक-निंबाळकर,**
समिती प्रमुख,
विधानपरिषद नियम समिती.

## अनुसूची - एक

**(१) दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत झालेला निर्णय**

"अधिवेशन काळात सोमवार ते शुक्रवार या दिवशी सभागृहाची वेळ दुपारी १२.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत राहील."

**(२) महाराष्ट्र विधानपरिषद अतारांकित प्रश्नांबाबत नियम ७० (२) मध्ये दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहामध्ये मा. पीठासीन अधिकारी यांनी केलेली घोषणा.**

"**तालिका सभापती :** माननीय सदस्यांनी दिलेल्या प्रश्नांमधील काही प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात येतात. सदर अतारांकित स्वीकृत प्रश्नांची उत्तरे विभागाने प्रश्न मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत विधानमंडळास पाठविणे बंधनकारक आहे. काही अतारांकित प्रश्नांची उत्तरे विहित मुदतीत प्राप्त होतात. तथापि, ब-याच वेळा अतारांकित प्रश्नांची उत्तरे ३० दिवसानंतरही प्राप्त होतात. परंतु, अशी प्रश्नोत्तरे जोपर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत नाहीत तोपर्यंत ते गोपनीय असल्यामुळे माननीय सदस्यांना वितरित करता येत नाहीत व त्यामुळे सदर प्रश्नांची उत्तरे माननीय सदस्यांना उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना त्या त्या विषयाच्या अनुषंगाने उत्तराच्या आधारे पुढील अधिवेशनात पाठपुराव्यासाठी अधिक माहितीसाठी प्रश्न उपस्थित करता येत नाही. त्यामुळे मी अतारांकित प्रश्नोत्तराच्या कार्यपध्दतीत अशी सुधारणा करीत आहे की, यापूर्वी फक्त अधिवेशन काळातच अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादया सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत होत्या, मात्र आता अतारांकित प्रश्नांची पर्याप्त उत्तरे प्राप्त झाल्यानंतर लगेचच प्रत्येक १५ दिवसांनी किंवा दर महिन्याला अतारांकित प्रश्नांची यादी सन्माननीय सदस्यांना टपालाव्दारे वितरित करण्यात यावी. तसेच या संदर्भात विधानपरिषदेच्या संबंधित नियमावलीमध्ये सुध्दा सुधारणा करण्यात यावी, असे मी निदेश देत आहे."

# अनुसूची - दोन

विधानपरिषद नियम - प्राप्त झालेल्या सूचना / सुधारणा

| अ.क्र<br>(१) | नियम क्रमांक<br>(२) | सुधारणा/सूचना<br>(३) | सुधारणेचे / सुचनेचे कारण<br>(४) | सूचक<br>(५) |
|---|---|---|---|---|
| १. | नियम ४ (२) मधील (अ), (ब) व (क) वगळणे | नियम ४ च्या पोट नियम २ मध्ये पुढील प्रमाणे मजकुर दाखल करण्यात यावा.—<br>"सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, सभागृहाच्या बैठकी सामान्यपणे—<br>सोमवार ते शुक्रवार या दिवशी दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन १४.३० ते १५.०० वाजेपर्यंतच्या अर्ध्या तासाच्या विश्रांती कालानंतर १९.०० वाजता समाप्त होतील." | मा. सभापती, मा. उपसभापती, मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद व सर्व पक्षांचे गटनेते यांच्या समवेत झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार म.वि.प. नियम ४ मध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय |
| २. | नियम ७०(२) | नियम ७० (२) च्या पोट नियम (२) मधील परंतुकानंतर पुढील परंतुक दाखल करण्यात यावे.—<br>"परंतु आणखी असे की,<br>मा. सभापतींना सभागृहाचे अधिवेशन सुरु नसेल तेव्हा अतारांकित प्रश्नांची उत्तरे विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आली नसली तरी, ती छापण्याचा, प्रसिध्द करण्याचा, प्रसृत करण्याचा तसेच,सदस्यांना वितरीत करण्याचा आदेश देता येईल. त्याबाबतीत, सभागृहाच्या पुढील अधिवेशनात पहिल्या सोयीस्कर वेळी अशी अतारांकित प्रश्नांची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील". | दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी मा. तालिका सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी सभागृहामध्ये घोषणा केलेल्या घोषणेनुसार म.वि.प. नियम ७० (२) मध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय |

## अनुसूची - तीन

### समितीने विचारात घेतलेल्या आणि मान्य केलेल्या सूचना / सुधारणा

**सुधारणा :**

**(१) नियम ४ च्या पोटनियम (२) मधील (अ), (ब) व (क) वगळून त्याऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईलः-**

“सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर सभागृहाच्या बैठकी, सामान्यपणे, सोमवार ते शुक्रवार या दिवशी दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन १४.३० ते १५.०० वाजेपर्यंतच्या अर्ध्या तासाच्या विश्रांती कालानंतर १९.०० वाजता समाप्त होतील”.

**(२) नियम ७० च्या पोटनियम (२) मधील परंतुकानंतर पुढील परंतुक दाखल करण्यात येईलः-**

“परंतु आणखी असे की, मा. सभापतींना सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल तेव्हा अतारांकित प्रश्नांची उत्तरे विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आली नसली तरी, ती छापण्याचा, प्रसिध्द करण्याचा, प्रसृत करण्याचा तसेच, सदस्यांना वितरीत करण्याचा आदेश देता येईल. त्याबाबतीत, सभागृहाच्या पुढील अधिवेशनात पहिल्या सोयीस्कर वेळी अशी अतारांकित प्रश्नांची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील”.

# परिशिष्ट - एक

(समितीच्या बैठका)

## पहिली बैठक

विधानपरिषद नियम समितीची बैठक मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता कक्ष क्र. १४५ पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती

**सदस्य**

(१) श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

(२) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

श्री. माणिकराव ठाकरे, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

**मा. सभापतींच्या निदेशानुसार सदर बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून उपस्थिती—**

श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव

(३) श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी

(४) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

सदर बैठकीत समितीकडे विचारार्थ असलेल्या सूचना/सुधारणांवर विचारविनिमय केला.

## दुसरी बैठक

विधानपरिषद नियम समितीची बैठक बुधवार दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता विधानपरिषद कामकाज सल्लागार समिती कक्ष क्रमांक १६, तळ मजला, जुने विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती

(१) श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

(२) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

श्री. माणिकराव ठाकरे, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी.

(४) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(५) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव

**संसदीय कार्य विभाग**

श्री. सु. अ. देशपांडे, सह सचिव.

समितीने प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.